सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.न. ५३३ ठ. क्र. ३२४
दि. २०।३।२०१५ रोजी ठेवता झालेला प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ९५ नुसार सन २०१४-१५ चे सुधारित व सन २०१५-१६ चे अंदाजपत्रक अ व क मा.आयुक्त यांनी दिनांक १२/२/२०१५ रोजी मा.स्थायी समितीकडे सादर केलेले आहे.मा.स्थायी समिती ठराव क्रमांक ७८८ दिनांक २०/३/२०१५ अन्वये सन २०१४-१५ चे सुधारित अंदाजपत्रकास शिफारस करण्यांत येत असून, सन २०१५-१६ चे अंदाजपत्रकामध्ये फेर बदल करुन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १०० अन्वये मान्यता मिळणेस्तव आलेल्या प्रकरणाचे अवलोकन केले. मा.स्थायी समितीने शिफारस केलेले सन २०१४-१५ चे सुधारित अंदाजपत्रक मंजूर करणेत येत आहे. तसेच सन २०१५-१६ चे अंदाजपत्रकात खालीलप्रमाणे फेरबदल करुन प्रस्तुत बदलासह सुचना शिफारशीसह महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १०० अन्वये अंदाजपत्रकास मान्यता देणेत येत आहे.

**महसुली जमा बाजू**

| पान नं. | अ.क्र | जमा विवरण | मा.स्थायी समितीने सुचविलेला अंदाज | मा.म.न.पा.ने केलेला बदल | | मा.म.न.पा.ने केलेला अंदाज |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | वाढ | कपात | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १६ | २ | **हद्दवाढ विभाग** | | | | |
| | ३) | इतर कर | २,५०,००,००० | ५०,००,००० | - | ३,००,००,००० |
| | ६) | सफाई पट्टी | २,५०,००,००० | १,५०,००,००० | - | ४,००,००,००० |
| | ७) | मलनित्सारण कर | ५,००,००,००० | ४,५०,००,००० | - | ९,५०,००,००० |
| १८ | ७ | **क) पथ व इमारती** | | | | |
| | १३ | खाजगी ले-आऊट ड्रेनेजलाईन सुपरव्हिजन चार्जेस | २,५०,००,००० | २५,००,००० | - | २,७५,००,००० |
| १९ | ८ | **भवने व भूमी यांची व्यवस्था** | | | | |
| | २) | उक्ते जागा इमारत भाडे | ८,००,००,००० | २,००,००,००० | - | १०,००,००,००० |

उपरोक्त बदलामुळे एकूण बेरजेत खालील प्रमाणे बदल करण्यांत येत आहे.

पृष्ठ क्र.२३ वरील १ ते १४ ची बेरीज र.रुपये ४६४,४३,९४,०००/- ऐवजी र.रुपये ४७३,१८,९४,०००/- इतकी येते. शिलकेसह एकूण र.रुपये ४७३,२१,५१,४०१/- इतकी येते.

महसुली खर्च बाजू

| पान नं. | अ.क्र | खर्च विवरण | मा.स्थायी समितीने सुचविलेला अंदाज | मा.म.न.पा.ने केलेला बदल | | मा.म.न.पा.ने केलेला अंदाज |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | वाढ | कपात | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| २४ | १ | **मुख्य देखरेख वसुली वगैरे** | | | | |
| | क | **महानगरपालिका नि स्थायी समिती** | | | | |
| | १ | **नगरसचिव कार्यालय** | | | | |
| | ३ | **इतर खर्च** | | | | |
| | २० | मा.महापौर वैद्यकीय मदत | ५,००,००० | ५,००,००० | - | १०,००,००० |
| ३६ | ३ | **प्राथमिक व दुय्यम शिक्षण** | | | | |
| | २ | बिगर प्राथमिक शिक्षण | २,००,००,००० | १,६८,७०,००० | - | ३,६८,७०,००० |
| ४३ | ५ | **रूग्णालय, प्रसुतीगृहे, औषधालये इ.** | | | | |
| | क | **ॲलोपॅथील दवाखाने** | | | | |
| | १५ | दोन रूग्णवाहिका खरेदी करणे | - | २५,००,००० | - | २५,००,००० |
| ५६ | १० | **उद्याने** | | | | |
| | क | **उद्यान प्रमुख कार्यालय** | | | | |
| | ४ | मनपा बागेची देखभाल दुरूस्ती | २५,००,००० | ७५,००,००० | - | १,००,००,००० |
| ५८ | १३ | **सार्व.संस्थांना देणग्या** | | | | |
| | क | **ऐच्छिक देणग्या** | | | | |
| | १ | ऐच्छिक देणग्या | ७,००,००० | ३,००,००० | - | १०,००,००० |
| ६२ | १६ | **विभागीय कार्यालय क्र.१** | | | | |
| | १९ | सांस्कृतिक कार्यक्रम खर्च | ३,००,००० | २,००,००० | - | ५,००,००० |
| ६४ | १७ | **विभागीय कार्यालय क्र.२** | | | | |
| | १९ | सांस्कृतिक कार्यक्रम खर्च | १,२५,००० | ३,७५,००० | - | ५,००,००० |
| ६६ | १८ | **विभागीय कार्यालय क्र.३** | | | | |
| | १९ | सांस्कृतिक कार्यक्रम खर्च | १,००,००० | ४,००,००० | - | ५,००,००० |
| ६८ | १९ | **विभागीय कार्यालय क्र.४** | | | | |
| | १९ | सांस्कृतिक कार्यक्रम खर्च | ५०,००० | ४,५०,००० | - | ५,००,००० |
| ७० | २० | **विभागीय कार्यालय क्र.५** | | | | |
| | १९ | सांस्कृतिक कार्यक्रम खर्च | ५०,००० | ४,५०,००० | - | ५,००,००० |
| ७१ | २१ | **विभागीय कार्यालय क्र.६** | | | | |
| | ९ | रस्ते दुरूस्ती | २२,००,००० | ३,००,००० | - | २५,००,००० |
| | १९ | सांस्कृतिक कार्यक्रम खर्च | १,५०,००० | ३,५०,००० | - | ५,००,००० |
| ७३ | २२ | **विभागीय कार्यालय क्र. ७** | | | | |
| | १९ | सांस्कृतिक कार्यक्रम खर्च | ३,००,००० | २,००,००० | - | ५,००,००० |
| ७५ | २३ | **विभागीय कार्यालय क्र.८** | | | | |
| | १९ | सांस्कृतिक कार्यक्रम खर्च | १,५०,००० | ३,५०,००० | - | ५,००,००० |
| ७७ | २४ | **महसुल निधीतून अ भांडवली कामासाठी** | | | | |

...३

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | क | महसूल निधीतून भांडवली कामासाठी वर्ग करणेची रक्कम | १२०,७५,९४,००० | १९,०५,२४,००० | | १३९,८१,१८,००० |
| | ख | पाणी पुरवठा सेवेसाठी येणा-या तुटीची वर्ग करणेची रक्कम | १३,३७,६९,००० | - | १३,३७,६९,००० | - |

उपरोक्त बदलामुळे एकुण बेरजेत खालील प्रमाणे बदल करण्यांत येत आहे.पृष्ठ क्र.७७ वरील १ ते २५ ची बेरीज ४६४,४३,९४,०००/- ऐवजी र.रुपये ४७३,१८,९४,०००/-इतकी येते. शिल्लकेसह एकुण र.रुपये ४७३,२१,५१,४०१/- इतकी येते.

**सार्व.आरोग्य अभियंता (पाणीपुरवठा ``क`` )**

जमा बाजू

| पान नं. | अ.क्र | जमा विवरण | मा.स्थायी समितीने सुचविलेला अंदाज | मा.म.न.पा.ने केलेला बदल | | मा.म.न.पा.ने केलेला अंदाज |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | वाढ | कपात | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १०५ | १ | **सार्वजनिक आरोग्य अभियंता** | | | | |
| | १ | पाणीपट्टी (कआकसप्र) | २५,००,००,००० | १०,००,००,००० | - | ३५,००,००,००० |
| | ३ | पाणीपट्टी (हवा) | १२,००,००,००० | ३,५०,००,००० | - | १५,५०,००,००० |
| | ५ | पाणीपट्टी (गवसू) | २,००,००,००० | १७,६९,००० | - | २,१७,६९,००० |
| | ११ | तुटीचे भरपाईपोटी म.न.पा.फंडातून वर्ग करणेची रक्कम | १३,३७,६९,००० | - | १३,३७,६९,००० | - |

उपरोक्त बदलामुळे पाणी पुरवठयाचे एकुण बेरजेत र.रुपये ६०,१९,६९,०००/- ऐवजी र.रुपये ६०,४९,६९,०००/- इतकी येते.

**सार्व.आरोग्य अभियंता (पाणीपुरवठा ``क`` )**

खर्च बाजू

| पान नं. | अ.क्र | खर्च विवरण | मा.स्थायी समितीने सुचविलेला अंदाज | मा.म.न.पा.ने केलेला बदल | | मा.म.न.पा.ने केलेला अंदाज |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | वाढ | कपात | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १०७ | १ | **सार्वजनिक आरोग्य अभियंता** | | | | |
| | २५ | पाणी पुर्नभरण योजना उपक्रम राबविणे (प्रत्येक प्रभागात १ याप्रमाणे) | - | ३०,००,००० | - | ३०,००,००० |

उपरोक्त बदलामुळे पाणी पुरवठयाचे एकुण बेरजेत र.रुपये ६०,१९,६९,०००/- ऐवजी र.रुपये ६०,४९,६९,०००/- इतकी येते.

..४

<u>जमा बाजू (भांडवली)</u>

| पान नं. | अ.क्र | जमा विवरण | मा.स्थायी समितीने सुचविलेला अंदाज | मा.म.न.पा.ने केलेला बदल | | मा.म.न.पा.ने केलेला अंदाज |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | वाढ | कपात | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| ८२ | अ | **महसुल निधीतून करावयाची कामे** | | | | |
| | १ | महसूल निधीतून वर्ग करणेची रक्कम | १२०,७५,९४,००० | १९,०५,२४,००० | - | १३९,८१,१८,००० |

उपरोक्त बदलामुळे अ ची बेरीज र.रुपये १४४,४५,९४,०००/- ऐवजी र.रुपये १६३,५१,१८,०००/- इतकी येते. अ ते ई ची बेरीज ६८३,४९,१६,०००/- ऐवजी र.रुपये ७०२,५४,४०,०००/- इतकी येते.

...५

## भांडवली कामाच्या खर्चाचा तक्ता

| अ.क्र. | विवरण | र.रुपये (लाखात) |
|---|---|---|
| १ | रस्ते बांधणे | ७५०.०० |
| २ | शहरातील बागांचे सुशोभिकरण करणे, सुधारणा करणे व नवीन बाग करणे | १००.०० |
| ३ | शहरातील पुतळे परिसर सुधारणा करणे व नवीन पुतळे बसविणे व स्मारक बांधणे | २००.०० |
| ४ | MIDC भागात विविध सुधारणा करणे (TCIDS) | १००.०० |
| ५ | वॉर्डवाईज कामे | ९४५.०० |
| ६ | नेहरू सायन्स सेंटर देखभाल दुरूस्ती | २८.०० |
| ७ | ड्रेनेजलाईन घालणे व गटारी बांधणे | ५००.०० |
| ८ | पाण्याच्या टाक्या बांधणे व पाईपलाईन घालणे / पंप व बीपीटी रिसायक्लिंग करणे (दररोज पाणीपुरवठा करणे) | १०००.०० |
| ९ | हदवाढ भागात मोजणी करणे | २०.०० |
| १० | बांधा, वापरा व हस्तांतरण करा योजना | १००.०० |
| ११ | नागरी दलित वस्ती पाणीपुरवठा योजना | २५.०० |
| १२ | गुंठेवारी क्षेत्रात मुलभूत सोयी करणे | १५०.०० |
| १३ | विविध योजनेसाठी DPR तयार करणे | १००.०० |
| १४ | आयएचएसडीपी योजना राबविणे (राहुल नगर) | ५००.०० |
| १५ | NTPC पाईप उजनी लाईन, सोरेगांव एक्स्प्रेस फिडर जागा संपादन इत्यादी | ५०.०० |
| १६ | विविध योजनेसाठी मनपा हिस्सा | ३०००.०० |
| १७ | भूसंपादन करणे / मनपा जागा ताब्यात घेणे. | ३००.०० |
| १८ | नाला ट्रेनिंग करणे नाला उंची वाढविणे | ४००.०० |
| १९ | शहर व हदवाढ भागातील विविध विकास कामे करणे | ४९८३.१८ |
| २० | मनपा दवाखाने सुधारणा करणे | २००.०० |
| २१ | दिवाबत्तीची सोय करणे | ३००.०० |
| २२ | स्मशानभूमी सुधारणा करणे | ३००.०० |
| २३ | शहरात विविध ठिकाणी महिलांसाठी सुलभ शौचालय बांधणे | २००.०० |
| २४ | मा.महापौर सुचवितील ती कामे करणे | ५००.०० |
| २५ | मा.उपमहापौर सुचवितील ती कामे करणे | ४००.०० |
| २६ | मा.अध्यक्ष स्थायी समिती सुचवितील ती कामे करणे | ४००.०० |
| २७ | मा.सभागृहनेता सुचवितील ती कामे करणे | ४००.०० |
| २८ | मा.विरोधी पक्षनेता सुचवितील ती कामे करणे | २५०.०० |
| २९ | जे.एन.एन.यु.आर.एम. योजनेसाठी | ३००.०० |
| ३० | जुळे सोलापूर येथे अत्याधुनिक सुसज्ज नाट्यगृह बांधणे | ५०.०० |
| ३१ | अक्कलकोट रोड एम.आय.डी.सी. येथील सामुहिक सांडपाणी प्रक्रिया केंद्र | २००.०० |
| ३२ | सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविणे | १००.०० |
| ३३ | घंटागाडी कंटेनर व ड्रम खरेदी | ३००.०० |
| | एकूण | १६३५१.१८ |

मा. सभासद बंधू भगिनीनो, महानगरपालिकेचे बजेट आत्ताच मा. चेअरमन यांनी सादर केलेले आहे. या बजेटशिवाय महानगरपालिकेचे काही उत्पन्न ढिसाळ प्रशासनातील अधिका-यांच्या निष्काळजीपणामुळे व जाणिवपुर्वक भ्रष्टाचाराला खत पाणी घालण्याच्या प्रवृत्तीने तसेच गेली १० ते १५ वर्षात लागलेली गळती थांबविण्यासाठी या ठरावाव्दारे मी कांही उत्पन्नाच्या बाबी बजेटमध्ये गृहित धरलेल्या नाहित कारण त्यामुळे बजेट फुगले जाईल व वास्तववादी बजेट राहणार नाही म्हणून लपलेली वस्तुस्थिती या ठरावाव्दारे मी खालीलप्रमाणे मांडत आहे.

<u>नगर अभियंता :-</u>

१) शहरामध्ये अनाधिकृत बांधकामाची संख्या मोठया प्रमाणात असल्याचे महानगरपालिकेच्या सॅटेलाईटवरुन दिसून येते. जवळपास १ लाख बांधकामे अनाधिकृत आहेत. ही सर्व बांधकामे नियमित करणे त्यासाठी शासनाची अद्ययावत नियमावली येऊ घातलेली आहे त्या नियमावलीचा उपयोग करुन यातील जी बांधकामे कायदेशीर होतील ती कायदेशीर करणे व गेल्या १० वर्षाचा महसूल बांधकाम विकास शुल्क बांधकामधारकांकडून वसूल करावा यासाठी दंडात्मक कारवाई करुन कायदेशीर करणे क्रमप्राप्त आहे. या करिता बांधकाम परवानगी विभागाच्या या कामाकरिता सहा ज्युनियर इंजिनिअर, दोन असिसटंट इंजिनिअर, एक डेप्युटी इंजिनिअर, सहा सर्व्हेअर असा स्टॉफ सत्वर उपलब्ध करुन देण्याबाबत मा. आयुक्तांना या ठरावाव्दारे सुचित करण्यात येत आहे. या माध्यमातून महानगरपालिकेस जवळपास ५० कोटीचे विकास शुल्क दंडात्मक कारवाईतून मिळणार आहे. हा इष्टांक पुर्ण करणे नगर अभियंतावर बंधनकारक असून त्याप्रमाणे त्वरीत यंत्रणा उभी करुन कार्यवाही करण्यात यावी.

२) शहरात शिवाजी चौकात वाहतूकीची कोंडी प्रवासी नागरिकांची होणारी वर्दळ त्रास, प्रचंड प्रदुषण आणि यामुळेच फ्लाय ओव्हर ब्रीजची होणारी मागणी वाहतूकीचा होणारा कोंडमारा यामुळे पोलिस यंत्रणेवर पडणारा ताण प्रदुषण कमी होण्यासाठी या सर्व बाबींवर एकत्रित उपाय म्हणजे जुना पुणा नाका ते एस आर पी कॅंप असा चार पदरी ५४ मिटरचा रस्ता टी पी -डी पी मध्ये मंजूर असून तो नगरोत्थान योजनेमध्ये एम एस आर डी सी च्या यादीतही मंजूर आहे. तो डेव्हलप करण्याच्या दृष्टीकोनातून यापुर्वी निर्णय होऊनही या रस्त्याला प्राधान्य देण्यात आले नाही. या रस्त्याला प्राधान्य दिल्यास महानगरपालिकेच्या उत्पन्नामध्ये फार मोठी भर पडणार आहे. पुणे नाका ते एस आर पी कॅंप व्हाया देगांव रामवाडीकडे जाणारा रस्ता त्यामुळे जवळपास अंदाजे या शहरात तीन हजार एकर जमिनीचा परिसर लोकवस्तीसाठी उपलब्ध होईल यामुळे शहरातील घरांचे भाव कमी येण्यास मदत होईल. शहरातील प्रदुषण कमी होईल यामुळे वाहतूकीचा कोंडमारा सोडविणे, प्रवाश्यांची लूटमार थांबविणे यासाठी हा रस्ता होणे अत्यंत महत्वाचे आहे. यामुळे पुणे रोड मार्गे हैद्राबाद रोड मार्गे येणारी सगळी वाहतूक शहरात प्रवेश करताना शिवाजी चौकातून न येता ती वेगवेगळया ठिकाणावरुन एस आर पी कॅंप मार्गे शहराच्या बाहेर गेल्याने शहरातील वाहतूकीचा कोंडमारा सुटून प्रदुषण कमी होणार आहे. या रस्त्याचे टेंडर व इतर प्रक्रिया मंजूर असूनसुंध्दा प्रशासनाने जाणिवपुर्वक शहराच्या विकासाला खिळ घातलेली आहे. हा रस्ता म्हणजे शहराच्या प्रगतीचे प्रवेशव्दार होणार आहे. या नविन ले आऊटमुळे रहिवाशी झोन, उद्योग धंदे, मेडीकल झोन वैगेरे वाढून १०० कोटीचे उत्पन्न या रस्त्यामुळे वाढणार आहे. या करिता या रस्त्यास प्राधान्य घेणेबाबत ही सभा मान्यता देत आहे. शहरात हा मुख्य रस्ता होण्याच्या दृष्टीने सन २०१५-१६ मध्ये या रस्त्याचे काम त्वरीत चालू करण्यात यावे.

३) महाराष्ट्र शासनाकडे ७० टक्के ३० टक्के प्रमाणे रस्त्याची योजना शासनाकडे पेंडींग आहे. त्यावर वर्षापेक्षा अधिक कालावधी लोटलेला आहे. त्यासाठी प्राधान्यक्रम देऊन महानगरपालिकेचे शिष्टमंडळ प्रशासन व पालकमंत्री आणि सर्व आमदार,सर्व खासदार यांच्या नेतृत्वाखाली मान्यता मिळून घेण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करुन जी रस्त्याची योजना शासनाकडे पेंडींग आहे त्यास मान्यता मिळवणेसाठी सक्रीय राहणे गरजेचे आहे.

४) प्रत्येक वॉर्डात १० मिनी गाळे नगरसेवकांच्या शिफारशीने जागा निश्चित करुन तेथील छोटया व्यापा-यांना उपलब्ध करुन देण्याबाबत या ठरावाव्दारे मान्यता देत आहे.

...७

५) २५६ गाळयाचे क्षेत्र जवळपास सहा एकर असून यासर्व गाळयातील असलेले २५६ गाळयाचे इमारतीचे आयुष्यमान संपलेले आहे. येथील गाळेधारकही बदलेले आहेत यापुर्वी महानगरपालिकेने भोगवाटाधारक गाळेधारकांना कांही सवलती दिल्या त्याचाही उपयोग भोगवाटाधारकांनी केलेला नाही. या ठिकाणी जे मुळ गाळेधारक आहेत त्यांना कायद्यानी गाळे देणे बंधनकारक आहे त्यांची यादी निश्चित करुन जे अनाधिकृत आहेत,त्यांचेकडून नियमाप्रमाणे कब्जा घ्यावा तसेच तेथे बाजूलाच मार्केट यार्ड असल्याने रेसिडेअन्शील कम कमर्शियल अशा गोधारकांसाठी घरकुल योजना तयार करुन राहिलेल्या जागेत ले आऊट करुन त्याठिकाणी शहरातील रिटेल मार्केट,जेकार्ड भवन बी.ओ.टीवर उभे करण्यास मान्यता देणेत येत असून,मा.आयुक्तांनी ठरावाप्रमाणे कार्यवाही करावी.

६) शहरातील प्रायव्हेट सोसायटीमधील रस्ते, ओपन स्पेस या ठिकाणी महानगरपालिचे खर्चाने कामे करण्यापुर्वी ती ताब्यात घेणेची कार्यवाही करावी सोसायटीने ताब्यात दिल्यानंतर महानगरपालिकेच्या वतीने सुधारणा करणेस मान्यता देणेत यावी.

**<u>भुमी व मालमत्ता :-</u>**

७) महानगरपालिकेचे शॉपिंग सेंटरमधील ट्रान्सफरसाठी आलेले अर्ज, परस्पर झालेले व्यवहार व गेल्या १० ते १५ वर्षात भाडेवाढ न केल्यामुळे ऑक्युपन्सी प्राईसमध्ये वाढ करणेबाबत व भाडेवाढ करणेबाबत अशा सर्व बाबी बाबत शहरात मोर्चा रुपाने अंदोलन झाले होते. हा संपूर्ण विषय गेल्या १० ते १५ वर्षात निर्णय न झाल्यामुळे व योग्य ती भाडेवाढ,ट्रान्सफर,ऑक्युपन्सी प्राईस या सर्व बाबींचा विचार न केल्यामुळे महानगरपालिकेचे नुकसान झालेले आहे. सबब सदरचा विषय त्वरित वेगवेगळे ट्रान्सफर,भाडेवाढ वगैरे अशी वेगवेगळी वर्गीकरणाद्वारे विषय त्वरित स्थायी समितीकडे पाठवून स्थायी समितीमार्फत सभागृहाकडे विषय निर्णयास्तव पाठविण्यांत यावा यास मान्यता देण्यात येत असून,पुर्वी केलेल्याठरावाची अम्मलबजावणी करण्यांत येऊ नये.

८) महानगरपालिकेच्या मालकीच्या जागांवर बी.ओ.टी.तत्वावर योजना राबविण्याबाबत व तसा प्रस्ताव सभागृहाकडे पाठविण्याबाबत या ठरावाद्वारे मान्यता देण्यांत येत आहे. जागेचे टायटल ,सर्च रिपोर्ट व जरुर त्या मान्यता या सर्व बाबीशी अविन राहून एक महिन्याच्या आत संपूर्ण कागदपत्रासह प्रस्ताव सभागृहाकडे पाठविण्यांत यावा.

**<u>सार्वजनिक आरोग्य अभियंता :-</u>**

९) शहराला आता सध्या चार दिवसाआड पाणी पुरवठा होत आहे. या पाणी पुरवठयामुळे ११ लाख नागरिक व लोक प्रतिनिधी त्रस्त आहेत. महाराष्ट्रात सगळयात चांगला पाणी पुरवठा असणारे एकेकाळचे शहर ज्याला हिप्परगा तलावातून ग्रॅव्हीटीने पाणी पुरवठा होत होता. उजनी व सोरेगांव या दोन्हीही जलस्त्रोतातून ८० व ८० एम एल डी असे एकुण १६० एम एल डी पाणी पंपींग करण्याची योजना एग्झीस्टींग असूनसुध्दा प्रत्यक्षात पाणी गळती यामुळे ११ लाख जनतेच्या घरापर्यंत पाणी पाहोचत नाही हा एक नियोजनातील फार मोठा अभाव आहे.

गेल्या १० ते १५ वर्षात महानगरपालिकेने यु.आय.डी.एस.एस.एम.टी.मार्फत १०० कोटीचे काम केले. महानगरपालिकेच्या भांडवली कामे तरतूदीमधून जवळपास १०० कोटीपेक्षाही अधिक रकमेचे कामासाठी तसेच शासकीय निधीमधूनसुध्दा अशी कामे केली. अशा अनेक माध्यमातून ३०० कोटीची कामे केली. यामध्ये १७ टाक्या एग्झीस्टींग लाईन, ट्रान्समिशन लाईन, नवीन टाकण्यात आलेल्या पाईप लाईन्स, एम बी आर भरणेसाठी टाकण्यात आलेली डायरेक्ट एक्सप्रेस लाईन अशी अनेक कामे व सोयी सुविधा उपलब्ध करुनसुध्दा शहराचा पाणी पुरवठा पुर्वीप्रमाणे दररोज करणेंत येत नाही. दिनांक १/४/२००१ पासून एक दिवसाआड पाणी पुरवठा परत १२/३/२०१३ पासून दोन दिवसाआड पाणी पुरवठा त्यानंतर १५/५/२०१३ पासून तीन दिवसाआड पाणी पुरवठा आणि ११/९/२०१४ पासून तीन ते चार दिवसाआडचा पाणी पुरवठा सध्या होत आहे याचा अर्थ एवढाच की, एवढी मोठी कामे करुनसुध्दा पाण्याचे स्टोअरेजमध्ये वाढ होऊन, पाण्याची आवक वाढून, शहराच्या लोकसंख्येचा विचार करता एक दिवसाआड पाणी पुरवठा करणे शक्य असतानासुध्दा केवळ नियोजनाचा अभावामुळे पाणी पुरवठा व्यवस्थित करता आले नाही.केवळ १०० दिवस पाणी पुरवठा करुन वार्षिक बिले घेतले जाते.१ जून पासून एक दिवसाआड पाणी पुरवठा व्हावा म्हणून अंदाजपत्रकात महसूली विभाग व भांडवली विभागाकडे कोटयावधी रुपयाची तरतूद करण्यांत आलेली आहे.सबब १ जून पासून एक दिवस आड पाणी पुरवठा करणेची कार्यवाही करावी व यापूर्वी पाणीपट्टीमध्ये करण्यांत आलेली वाढ रद्द करण्यांत येत आहे.

...८

वरचेवर पाणी पुरवठा विस्कळीत होत आहे. लोकप्रतिनिधी व जनता हैराण झालेली आहे. यास्तव श्री.होलाणी यांनी १२४० कोटींचा वेगळा पाणी पुरवठयाचा प्रोजेक्ट तयार केलेला आहे. सध्या वरीलप्रमाणे केलेले १७ टाक्या एग्झीस्टींग लाईन, ट्रान्समिशन लाईन, नवीन टाकण्यात आलेल्या पाईप लाईन्स, एम बी आर भरणेसाठी टाकण्यात आलेली डायरेक्ट एक्सप्रेस लाईन टेक्नीकलीदृष्टया योग्य झाले आहे किंवा नाही पाण्याचा साठा वाढूनसुध्दा पाणी मिळत नाही तिनही स्त्रोतातून १६० एम एल डी पाणी येत असताना २४ तास पंपींग करुनसुध्दा सोलापूरला पाणी पुरवठा सुरळीत होत नाही. या सर्व प्रश्नाचे उत्तर शोधून काय चूक नेमकी झालेली आहे विद्यमान अधिका-यांनी केलेली कामे तसेच गेल्या १० ते १५ वर्षामध्ये केलेली कामे याचा टेक्नीकली अभ्यास करुन एक दिवसाआड पाणी पुरवठा करण्यासाठी श्री.होलाणी यांची तज्ञ समिती नेमून एक महिन्याच्या आत या सभागृहाकडे त्यांचा अहवाल मा. आयुक्त यांनी सादर करावा.

या कमिटीमध्ये मा.महापौर व मा.पदाधिकारी व महानगरपालिकेतील सर्व पक्षीय टेक्नीकल व अनुभवी इंजिनिअर असलेले नगरसेवक या सगळयांचे म्हणणे ऐकून वस्तूस्थितीची गांभिर्य समजून घेणेबाबत व लोकप्रतिनिधीचे मनातील शंका व पाणी पुरवठयामध्ये झालेला घोटाळा नियोजनाची दुर्बलता भ्रष्टाचार व चो-या या सर्व प्रश्नांवर वरील लोकप्रतिनिधीशी चर्चा करुन थोडक्यात त्यांच्या मनाच्या गोषवाराचा विचार करुन श्री.होलाणी साहेब यांनी सर्व वस्तूस्थितीचा विचार करुन पाणी पुरवठा योजनेचा सगळा अभ्यास करुन अद्ययावत अहवाल पाठवावा. असे या ठरावाव्दारे सुचित करण्यात येत असून अहवालाच्या अंतिम निर्णयानंतर पाणी पुरवठाबाबत योग्य तो निर्णय घेतला जाईल.

१०) सोरेगांव व देगांव येथील असलेल्या म.न.पा. च्या ३५ एकर जमिनीवर पाणी पुरवठयासाठी केंद्र शासनाच्या नवीन योजनेनुसार वीज निर्मिती योजना कार्यान्वित करण्यात यावी. या मुळे तेथे वीज पुरवठा पुर्ण होईल. सदरची योजना केंद्र शासनाच्या व राज्य शासनाच्या मदतीने त्वरीत राबविण्यात यावी.

<u>एल बी टी विभाग :-</u>

११) एल बी टी च्या बाबतीत महानगरपालिकेच्या प्रशासनाने अत्यंत निष्काळजीपणा केला असून यामध्ये फार मोठा भ्रष्टाचार एल बी टी धारक व प्रशासनातील अधिकारी यांचेमध्ये झालेला दिसून येत आहे. महानगरपालिकेचे उत्पन्नातील जवळपास प्रतिवर्षी ५० कोटीचे नुकसान झालेले आहे. सन २०११-१२ ते २०१४-१५ पर्यत या पाच वर्षात एल बी टी लागू झाल्यानंतर एल बी टी भरण्यास पात्रधारकांची यादी संख्या व यादीनुसार होणारी संख्या, सेल्स टॅक्स ऑफिसकडून आलेली यादी, जकातीची यादी वैगेरे माध्यमातून एल बी टी धारक निश्चित करणे या संबंधि सर्व एल बी टी धारकांचे विवरणपत्र प्रशासनाकडे दाखल होणे व त्यातून नियोजनाप्रमाणे त्यांचे विविरणपत्राप्रमाणेसुध्दा उत्पन्न येणे अपेक्षित होते. सन २०१४-१५ ला २५ कोटीचे उत्पन्न कमी आलेले आहे. व्यापा-यांचे उत्पन्न विवरणपत्राप्रमाणे कमी आलेले आहे. त्या विवरणपत्राचे हेअरिंग घेऊन त्याचा टॅक्स निश्चित झालेला नाही त्यामुळे या पाच वर्षात प्रतिवर्षी ५० कोटीचे उत्पन्न बुडालेले आहे. विवरणपत्राच्या आधारे चौकशी होऊन व महानगरपालिकेकडे उपलब्ध असलेल्या माहितीच्या आधारे निर्णय होऊन सदरचा टॅक्स वसूल करण्यास व थकबाकीची नोटीस देऊन प्रत्यक्षात त्यांना टॅक्सच्या प्रवाहात आणणे आवश्यक आहे तसेच गेल्या पाच वर्षात एकूण एल बी टी धारकांची संख्या किती त्यांचा संख्यात्मक आकडा किती ? या माहितीचे अवलोकन करता प्रतिवर्षी ५० कोटीची एल बी टी बुडल्याचे दिसून येते. तरी या ठरावाव्दारे एल बी टी धारकांकडून एल बी टी टॅक्स वसूल करणेकरीता एक सहाय्यक आयुक्त व त्यांना लागणार अनुभवी स्टॉफ हा त्यांना त्वरीत उपलब्ध करुन याचे संपूर्ण कॉम्प्युटराईज्ड तक्ता करुन तीन महिन्याच्या आत पुर्तता केल्यास महानगरपालिकेला किमान १०० कोटीचे उत्पन्न यापासून उपलब्ध होणार आहे. एल बी टी थकित धारकांची यादी सभागृहाकडे पेठवाईज पाठवून दयावी. व्यापा-यांनी भरलेली रक्कम व येणारी थकबाकी या सर्व माहितीसह स्वयंस्पष्ट असा अहवाल पाठविण्यात यावा.

...९

**कर आकारणी कर संकलन विभाग :-**

१२) या विभागाकडून ७६ टक्के टॅक्सची वसूली झालेली आहे. टॅक्सेबल घरे किती, टॅक्सेबल न झालेली घरे ही दिड लाखाचे आसपास असून टॅक्स विरहीत ही घरे गेल्या १० ते १५ वर्षापासून महानगरपालिकेच्या सर्व सोयी सुविधा व फायदे घेत असून कोणत्याही प्रकारचा टॅक्स देत नाही. गेली १२ वर्षे म्हणजे तीन टर्ममध्ये महानगरपालिकेने रिव्हीजन न करता प्रशासनाने महानगरपालिकेचे फार मोठे अर्थिक नुकसान केलेले आहे. या आकारणीमधून महानगरपालिकेचे मिळणारे उत्पन्न प्रशासनाने बुडविलेले आहे. एकंदरीत टॅक्सेबल घरे एग्झीस्टींग घराच्या बांधकामामध्ये झालेला बदल, कमर्शियल, रेसिडेन्शीअल वापर असणारी घरे एकुण शहर व शहर हदवाढ, झोपडपट्टी भागात साडेतीन लाखापेक्षा अधिक घरे असून अडीच लाखाचीच नोंद प्रत्यक्षात दिसून येत आहे. याची गांभिर्याने दखल घेणे आवश्यक आहे. टॅक्स नुतनीकरणाचा प्रस्ताव सभागृहाकडे पेंडींग आहे या बाबत सभागृहाने त्वरीत निर्णय घ्यावा. रिव्हीजन करण्यासाठी पाच कर संकलन अधिका-यांची नेमणूक करुन त्यांना आवश्यक असणारा स्टॉफ स्वतंत्ररित्या देऊन पाच टीमव्दारे तीन महिन्याच्या आत नोटीसा देणे प्रत्यक्षात जागेची पाहणी करणे, मोजमाप घेणे, स्पेशल नोटीसा देणे व हेअरिंग करणे ही सर्व प्रक्रिया सहा महिन्याच्या आत मा. आयुक्त यांनी प्रशासनामार्फत पुर्ण करुन याव्दारे जवळपास ५० कोटीचे उत्पन्न महानगरपालिकेला अधिक मिळणार आहे जर सभागृहाने रेडीरेकनरच्या दरांचा निर्णय घेतल्यास त्याचाही फायदा या निर्णय प्रक्रीयेला त्वरीत होईल. रिव्हीजन केले गेल्यास ५० कोटीपेक्षा अधिक उत्पन्न अपेक्षित आहे.

१३) शहरातील शैक्षणिक संस्थेचे वर्गीकरण करण्यात यावे. ज्या शाळा शासनाच्या अनुदानाशिवाय कमर्शियल पध्दतीने चालविल्या जातात व ज्याशाळा शासनाच्या अनुदानाने मोफत चालविल्या जातात अशा प्रकारचे वर्गीकरण करुन अशा शाळांना बिगर घरगुती दराने होणारी आकारणी बंद करुन ज्या शाळा सामाजिक जाणिवेतून शासनाच्या मदतीने चालविल्या जातात त्या सर्व शाळांना घरगुती दराने पाणी पट्टीची आकरणी करण्यात यावी.

**मंडया नि उद्यान :-**

१४) म.न.पा.चे असलेल्या सर्व मंडयांचे खाजगीकरण करुन उत्पन्नात वाढ करण्यात यावी. मोकाट सुटलेली जनावरे शहरातील वाहतूकीला अडथळा करतात यामुळे लहान मुलांच्या जीवीताला धोका पोहोचतो यामुळे ही जनावरे कोंडवाडयात टाकण्याची यंत्रणा विस्किळीत झालेली आहे. ही जनावरे गो शाळेकडे माफक दरात सोपाविण्यात यावी.

१५) दर तीन महिन्यातून मा.महापौर, मा.पदाधिकारी यांचे समवेत उत्पन्नाचे व इतर कामकाजाचे संदर्भात तसेच बजेटच्या सुचना व शिफारशी संदर्भात तीन महिन्यातून एकदा मा.महापौर यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठकीचे आयोजन करण्यात यावे.

१६) उद्याने व चौक सुशोभिकरण करणेसाठी व्यापारी / उद्योजकाकडून योजना मागवाव्यात.

१७) शहरात महिलांसाठी व प्रवाशांसाठी व सामान्य गरिब जनतेसाठी सुलभ शौचालयाची निर्मिती करणे व ते टेंडर पध्दतीने देणे. प्रसंगी महानगरपालिकेची जागा खाजगी उद्योजकाला दिली असल्यास ती परत घेऊन त्या ठिकाणी सुलभ शौचालयाची निर्मिती करणे

**बचत गट**

१८) बचत गटाच्या माध्यमातून निर्माण होणारे उत्पादनांना बाजारपेठ मिळवून देण्यासाठी वर्षातून चार वेळेस होम मैदान उपलब्ध करुन दयावे व त्यासाठी महानगरपालिकेने पुढाकार घ्यावा.

...१०

स्मार्ट सिटी

१९) स्मार्ट सिटी शहरासाठी डी पी आर तयार झालेला असून सदर डी पी आर प्रमाणे केंद्र शासनाच्या व राज्य शासनाच्या सुचनेप्रमाणे या मध्ये असलेल्या उणीवा दुर करुन असलेल्या कमतरता पुर्ण करुन स्मार्ट सिटीमध्ये समावेश करण्यासाठी एका तज्ञ एजन्सीची नेमणूक झालेली आहे. त्या योजनेला कार्यान्वित करणेबाबत कार्यवाही करावी व याबाबत मा. महापौर , पालकमंत्री मा.ना. विजयकुमार देशमुख ,मा.शरद बनसोडे खासदार, जिल्हयाचे खासदार मा.विजयसिंह मोहिते पाटील यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमून त्याचा पाठपुरावा करण्यात यावा.

जेथे ड्रेनेज नाही तेथे युजर चार्जेस घेऊ नये असा प्रशासनाचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेने मान्य करुन ज्या ठिकाणी ड्रेनेज लाईन नाही अशा ठिकाणी युजर चार्जेस घेण्यात येऊ नयेत असा ठराव यापूर्वी देखील करण्यात आलेला आहे. त्याप्रमाणे अंमलबजावणी करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

जिल्हा नियोजन समिती करिता लागणारा मनपा हिस्सा भांडवली कामाचा खर्चाचा तक्त्यामधील ज्या त्या हेडमधून करण्यात यावा. व उर्वरीत हेड मधील शिल्लक रक्कमेतून कामे सुचविणे अथवा बदल करणेचा अधिकार मा.महापौर व मा.सभागृहनेता यांना राहील.

मा.महापौर, मा.उपमहापौर, मा.अध्यक्ष-स्थायी समिती , मा.सभागृह नेता, मा.विरोधी पक्ष नेता, मा.अध्यक्ष प्रभाग समिती तसेच मा.विशेष सात समित्यांचे अध्यक्ष/ मा.महापौर यांना ऐच्छिक खर्चाची जी रक्कम तरतूद करण्यात आली आहे त्यास मा.म.न.पा.पदाधिकारी यांना जो खर्च करणे आवश्यक वाटेल अशा खर्चासाठी जी रक्कम तरतूद करण्यात आली आहे त्यास जे ते मा.पदाधिकारी मंजूरी देतील ती मान्यता सक्षम राहील.

भांडवली कामाचे यादीतील कामात बदल करणेचे अधिकार मा.सभागृहनेता यांना अधिकार देण्यास मान्यता देणेत येत आहे.

एच बी वाय श्री या टी.पी. स्कीमच्या नियमामध्ये शिथिलता करण्याकरिता तसा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेकडे पाठविण्यांत यावा. यामुळे सुध्दा महानगरपालिकेच्या उत्पन्नामध्ये १०० कोटीची भर पडू शकेल.

आरोग्य खात्याकडे दवाखाने यासंबंधीचा एक विभाग व कचरा संकलन करणे वगैरे संबंधीत स्वतंत्र विभाग तयार करुन दोनही विभागांवर स्वतंत्रपणे अधिका-यांची नियुक्ती करण्यांत यावी.

शहरामध्ये असलेले आरोग्य खात्याकडील संपूर्ण दवाखाने सक्षम करण्याकरिता तेथे कोणकोणत्या साधनांची किंवा सोई सुविधांची उपलब्धता आवश्यक आहे. तसेच दवाखान्यामधून लागणारा संबंधित स्टाफ याबाबतची तपासणी करुन सत्वर यादी सादर करण्यांत यावी.

दवाखान्यामध्ये नेमणूक करण्यांत आलेल्या संबंधित डॉक्टर्स तसेच सर्व सेवकांनी ,त्यांना नेमून दिलेल्या वेळेत, वेळेवर उपस्थित रहाणे आवश्यक असून, कोणीही यामध्ये कुचराई केल्यास त्यांचेवर कारवाई करण्यांत यावी.

शहरामध्ये ॲम्ब्युलन्सची सोय मोफत करण्यांत यावी. याकरिता २ नविन ॲम्ब्युलन्स खरेदी करण्यांत याव्यात.

मंडई विभागाकडील सर्व भाजी मंडयांमधील ओटे ओटेधारकांना वर्षाचे कालावधीसाठी टेंडर पध्दतीने विक्री करण्याकरिता जरुर तो प्रस्ताव पाठविण्यांत यावा.

शहरातील असलेल्या ड्रेनेज लाईन्समधील ,मॅनहोलमधील गाळ काढणेकरिता तज्ञ कर्मचा-यांची टिम नियुक्त करण्यांत यावी. अथवा याबाबत कॉंट्रॅक्ट पध्दतीने बाजारभावाने काम देऊन त्वरेने अशी कामे करुन घेण्यांत यावे.

नगरसचिव कार्यालयाकडील रिक्त असलेल्या सायक्लोस्टाईल ऑपरेटर या पदी याच कार्यालयाकडे कार्यरत असलेले श्री. शेखर सकट यांची नेमणूक करण्यास मान्यता देण्यांत येत आहे.

परिवहन विभागाकडील श्री. जयप्रकाश आमणगी क.श्रे.लिपिक हे सध्या नगरसचिव कार्यालयाकडे कार्यरत आहेत. परंतु त्यांचे वेतन हे परिवहन विभागाकडेच असून, त्यांचे सेवापुस्तकासह वेतन नगरसचिव कार्यालयाकडे वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे.

मुख्यलेखापाल कार्यालयात सन २००७ पासून काम करणारे श्री.एफ.आय.पटणी,संगणक चालक हे गेल्या सात वर्षापासून अत्यंत महत्वाच्या असे महानगरपालिकेचे बजेटचे काम उत्कृष्टपणे करीत आहेत.त्यांना महानगरपालिका अधिनियमातील कलम ५३(३)नुसार वेतनश्रेणी ५२००-२०२०० ग्रेडपे १९०० वर संगणक चालक हे पद निर्माण करुन सदर पदास मा.शासनाची मान्यता मिळेतोपर्यंत नियुक्ती देणेस,किंवा रिक्त असलेल्या संगणक चालक /क.श्रे.लि या पदावर नियुक्ती देणेस,मान्यता देण्यांत येत आहे.याकामी जाहिर प्रसिध्दीकरणाची व इतर अट शिथिल करणेसही मान्यता देण्यात येत आहे.

महानगरपालिकांच्या दवाखान्यामध्ये सर्पदंश,श्वानदंश यांची लस वर्षभर उपलब्ध करुन देण्यांत यावी.

सोलापूर शहरात नविन उद्योगधंदे येणे आवश्यक आहे,त्याचप्रमाणे मनपा हद्दीतील अक्कलकोट रोड एम.आय.डी.सी. , होटगी रोड एम.आय.डी.सी. या ठिकाणी जर नव्याने उद्योगधंदा चालू केल्यास व त्यांची किमान गुंतवणुक ५० लाख ते १ कोटी रुपये इतकी असल्यास अशा उद्योगधंद्यांना मिळकत करामध्ये कराची आकारणी करतांना प्रथम वर्षी २० टक्के, दुसरे वर्षी ४० टक्के, तिसरे वर्षी ६० टक्के, चौथे वर्षी ८० टक्के, व पाचवे वर्षी १०० टक्के याप्रमाणे आकारणी करण्यांत यावी जेणेकरुन शहरामध्ये उद्योगधंदे वाढीला लागतील.

महानगरपालिकेचे उत्पन्न वाढीच्या दृष्टीकोनातून निरनिराळया बाबींवर चर्चा करण्यासाठी मा.महापौर यांचे अध्यक्षतेखाली यातील मनपा कामकाजातील तज्ञ मंडळींचा समावेश असलेली एक आर्थिक सल्लागार समिती निर्माण करण्यांत यावी.याची दरमहा बैठक घेउुन आर्थिक शिस्त येण्याच्या दृष्टीने कार्यवाही ठेवावी.

नवीन कंपनी कायद्यातील तरतुदीनुसार प्रत्येक लिमिटेड कंपनीस कॉरपोरेट सामाजिक दायित्व या अंतर्गत कंपनीच्या तीन वर्षाच्या ऐकूण नफयापैकी सरासरी दोन टक्के इतकी रक्कम सामाजिक दायित्व म्हणून सामाजिक उन्नती / कार्यासाठी खर्च करणे आवश्यक आहे. महानगरपालिकेस नागरिकांना सोईसुविधा पुरवणेकरिता मोठया प्रमाणात निधीची आवश्यकता आहे. तरी सोलापूर शहर व शहरालगत असलेल्या कंपन्याकडून कंपनी कायद्याच्या कारपोरेट सामाजिक दायित्व या धोरणानुसार शहरातील नागरिकांसाठी सोईसुविधा पुरवणे ,शैक्षणिक विकास,महिला बालकल्याण योजना,आरोग्य ,पर्यावरणाचा समतोल राखणे, सामाजिक उद्योग प्रकल्पांची अंमलबजावणी करणे आदिसाठी नफयाच्या पुर्ण दोन टक्केची रक्कम उपलब्ध करुन देण्यांत यावी. याकामी मा.आयुक्त यांनी सत्वर कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

यासाठी मुंबई,पुणे, नवी मुंबई या महाराष्ट्रातील तसेच अहमदाबाद ,सुरत अशा गुजरातमधील तसेच इतर राज्यामध्ये सुध्दा महापालिका स्तरावर एक विशेष गट स्थापन करण्यांत आला आहे. तरी उक्तप्रमाणे मा.महापौर यांचे अध्यक्षतेखाली पदाधिकारी व अधिकारी / खातेप्रमुख यांचा समावेश राहील.

वरील प्रमाणे कार्यवाही करणेस,मान्यता देण्यांत येत आहे.

तसेच महिला व बालकल्याण विभागासाठी तरतुद करणेत आलेल्या रक्कमेचा विवरण सोबत जोडला असून, त्याप्रमाणे रक्कमा तरतुद करणेस मान्यता देण्यात येत आहे. आणि अपंग सहाय्य योजना या करिता करणेत आलेल्या तरतुद रक्कमेचा विवरण ही सोबत जोडलेला असून, त्याप्रमाणे रक्कमा तरतुद करणेस ही मान्यता देण्यात येत आहे.

सोलापूर महानगरपालिकेचे दवाखान्याकरीता कोटयावधी रुपयांची तरतूद देऊनही त्यामध्ये सुधारणा होत नाही.दवाखाने आरोग्य विभागापासून स्वतंत्र करणेत येऊन,याकरीता आवश्यकतो डॉक्टर वर्ग व स्टाफ देण्यात येऊन,यावर नियंत्रण ठेवणेंकामी खालील प्रमाणे उपसमिती नेमण्यात येऊन,सदर समितीस मा.आयुक्तांपासून संबंधित अधिका-यांकडून आवश्यकतो प्रकरणी माहिती व रेकॉर्ड मागविणे,बैठका बोलाविणे व आवश्यकत्या सूचना करण्याचे अधिकार असतील. सदर उपसमितीच्या बैठकीस मा.आयुक्त,सहा.आयुक्त,आरोग्य विभागाकडील सर्व संबंधीत अधिकाऱ्यांनी उपस्थित राहण्यास मान्यता देण्यात येत आहे.

उपसमिती खालील प्रमाणे.

१) मा. महापौर,
२) मा. उपमहापौर,
३) मा. सभागृहनेता-कन्वेअर
४) मा. सभापती,स्थायी समिती
५) मा. विरोधी पक्षनेता
६) मा. सभापती वैद्यकीय सहाय्य नि आरोग्य समिती
७) मा. अँड. बेरिया यु. एन.
८) मा. सपाटे मनोहर गणपत
९) मा. दिलीप शंकर कोल्हे
१०) मा. सय्यद मौलाली बाशुमियाँ (बाबा मिस्त्री)
११) मा. कोळी संजय बसप्पा
१२) मा. आमणगी शैलेंद्र मल्लीनाथ
१३) मा. बच्चुल शशीकला नारायण
१४) मा. नवले जगदेवी विजय
१५) मा. रोटे सुनिता दादाराव
१६) मा. विटे माशप्पा सिद्राम

सोलापूर महानगरपालिका परिवहन उपक्रमाकडील चार जुनी बसेस अंतयात्रासाठी वापरण्यास मान्यता देण्यांत येत आहे. याकामी लागणारा खर्च हा म.न.पा.अंदाजपत्रकातील स्मशानभूमि देखभाल दुरुस्ती या सदरातून करण्यात यावा.

कामाचे वाढीव कॉंटीटी १०% पर्यंत असल्यास,पूर्वीप्रमाणे सदरील कामास मंजूरी देण्याचे अधिकार खातेप्रमुखांना अधिकार देण्यास तसेच मंजूर रकमेच्या आत १०% पेक्षा जास्त होणा-या वाढीव क्वॉन्टीटीस मान्यता देण्याचा अधिकार मा. आयुक्त यांना देण्यात येत आहे.

म.न.पा.पाणी पुरवठा कामी दोन टँकर तसेच ड्रेनेज कामाकरीता दोन जेटींग मशिन्स खरेदी करणेस मान्यता देण्यांत येत आहे.

एल.बी.टी.चे विवरण व अॅसेसमेंट तयार करुन घेण्यासाठी पेठवाईज सहा सी.ए.ची नेमणूक करणेस,मान्यता देण्यांत येत आहे.

अग्निशामक दलाकडील फायर फायटर सेवकांची संख्या कमी असल्याने फायर फायटर सेवक भरती करण्यास मान्यता देण्यांत येत आहे.

कर आ.कर सं.प्रमुख श्रीमती चंद्रभागा बिराजदार यांनी दि.३०/३/२०१५ रोजी रुपये १ कोटीची वसूली करुन भरणा मनपा ट्रेझरीत केल्याने त्यांचे अभिनंदन करण्यांत येऊन, प्रोत्साहनपर त्यांना एक जादा वार्षिक पगारवाढ मंजूर करणेस,मान्यता देण्यात येत आहे.

सोलापूर शहरामध्ये विविध क्रिडास्पर्धा विविध संस्था व म.न.पा.मार्फत भरविण्यांत येतात,अशा वेळेस खेळाडूंकरीता सोलापूर शहरामध्ये राहण्याची उत्तमरित्या व्यवस्था होणेकामी सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने क्रिडा वसतीगृह बांधण्यास मान्यता देण्यात येत आहे.

विरांगणी राणी आवंतीबाई लोधी व बाबू जगजीवनराज जयंती तसेच,मध्यवर्ती नाताळ महोत्सवासाठी अनुदान देण्यास मान्यता देण्यांत येत आहे.

सुशिल करंडक राज्यस्तरीय नाटय स्पर्धा भरविणेकरिता म.न.पा.च्या वतीने हुतात्मा स्मृती मंदिर विनामुल्य देणेस मान्यता देणेत येत आहे.

म.न.पा. डफरीन दवाखाना येथे होमिओपॅथीक विभाग सुरु करणेस मान्यता देणेत येत आहे.

...१३

महिला व बाल कल्याण विभाग

| अ.क्र. | विवरण | र.रुपये लाखात |
|---|---|---|
| १. | महिला व मुली करीता विविध तांत्रिक व व्यावसायिक प्रशिक्षण | १०.०० |
| २. | विडी कामगारांच्या मुर्लीना व गरजु महिलांकरिता व्यवसायिक प्रशिक्षण | १०.०० |
| ३. | वेश्या व्यवसायात गुंतलेल्या महिलांसाठी विविध प्रकारचे जिवन कौशल्य व व्यवसायिक प्रशिक्षण | ०२.०० |
| ४. | विद्यार्थीनी व महिलांसाठी विविध छंद वर्ग | ०३.०० |
| ५. | बाल मेळावा | ०१.५० |
| ६. | महिला लोकप्रतिनिधीसाठी अभ्यासदौरा | ०३.५० |
| ७. | इयत्ता १० वी व १२ वी सी.ई.टी.मेरिट मधील मुलींचा गौरव | ०१.०० |
| ८. | प्राणायम,कराटे,कुंगफू,शारिरिक विकास ,व्यायाम इत्यादी | ०३.५० |
| ९. | महिला व मुलींसाठी विविध प्रबोधनात्मक स्पर्धा,व्याख्यान | ०२.०० |
| १०. | महिला दिन सांस्कृतिक कार्यक्रम झोन निहाय | ०२.०० |
| ११. | महिलांसाठी समुपदेशन केंद्र (फर्निचर,स्टेशनरी,पुस्तके इ.) | ०३.५० |
| १२. | महिला व मुलींसाठी आरोग्य तपासणी (आरोग्य विभागाच्या विद्यमाने संपूर्ण आरोग्य तपासणी,औषधोपचार ८ | ०३.७५ |
| १३. | म.न.पा.दवाखान्यात गर्भवती महिलांसाठी पौष्टीक खाद्य,बाळंतपणातील आहार | ०३.०० |
| १४. | ज्या महिलांनी विविध क्षेत्रात उत्कृष्ट काम केले अशा महिलांचा गौरव | ०.८० |
| १५. | महिलांना कायदाविषयक सल्ला देण्यासाठी योजना राबविणे | ००.५० |
| १६. | महिला व बाल कल्याण साठी वाचनालय चालविणे (पुस्तके,फर्निचर,मानधन ) | ०३.५० |
| १७. | गर्दीच्या ठिकाणी पिण्याची पाण्याची व्यवस्था / महिलांसाठी प्रसाधनगृह बांधणे | ३०.०० |
| १८. | वृध्दांना काठी,चष्मा वाटप,नेत्र तपासणी | ०२.०० |
| १९. | इयत्ता १ ली ते १० वी च्या मुलींसाठी मोफत बस सेवा योजना | १४०.०० |
| २०. | सावित्रीबाई फुले,अहिल्याबाई होळकर,राजमाता जिजाऊ /मातोश्री रमाबाई आंबेडकर,इंदिरा गांधी पुण्यतिथी/जयंती निमित्त विविध कार्यक्रम त्यांचे नांवे पुरस्कार देण्यांत यावे. | ०२.०० |
| २१. | महानगरपालिका क्षेत्रातील बालवाडीकरीता आवश्यक शैक्षणिक साहित्य खरेदी करणे | ०२.५० |
| २२. | महिलांसाठी विविध नाविण्यपूर्ण /प्रोत्साहनात्मक उपक्रम | ०३.०० |
| २३. | जननी शिशु सुरक्षा योजना | ७.०० |
| २४. | महिला बचतगट क्षमता बांधणी उद्योजकता प्रशिक्षण | ५.०० |
| २५. | महिला बचत गट उत्पादन वस्तू (साहित्य विक्री व प्रदर्शन ) | ०५.०० |
| २६. | कन्या कल्याण योजना निधी (पहिल्या,दुस-या मुलींच्या जन्मानंतर रक्कम रुपये ५०००/- ठेव योजना ) | ५.०० |
| २७. | कला क्रिडा शिक्षण व सांस्कृतिक क्षेत्रात परदेशात प्रतिनिधीत्व करणा-या महिला मुर्ली,मुले करीता प्रोत्साहनपर अनुदान | ५.०० |
| २८. | शिवण प्रशिक्षण झालेल्या आर्थिक दुर्बल घटकातील महिलांना शिवणयंत्र वाटप | १०.०० |
| २९. | आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील इयत्ता ५ वी ते १२ वी मध्ये शिकणा-या मुलींना सायकल वाटप | ६.५० |
| | **एकूण** | २७६.५५ |

| अ.क्र. | विवरण | र.रुपये लाखात |
|---|---|---|
| | **महिला व बाल कल्याण विभाग संकीर्ण** | |
| १. | मुद्रण (प्रेस्टीसाईन बोर्ड,फॉर्मस इत्यादी ) | ००.५० |
| २. | वृत्तपत्र खरेदी (समितीसाठी ) | ००.१० |
| ३. | पोस्टेज खर्च | ००.१५ |
| ४. | धुलाई ( पडदे इत्यादी ) | ००.०३ |
| ५. | दोन वाहनासाठी विमा हप्ता | ००.४७ |
| ६. | संगणक प्रिंटर कॉपियर (स्टेशनरी ) | ०१.०० |
| ७. | इंधन तेले , दुरुस्ती ( दोन वाहनासाठी ) | १०.०० |
| ८. | वाहन स्वच्छता,सुटेभाग रबरी धावा इत्यादी | ०१.५० |
| ९. | संकीर्ण साहित्य,फर्निचर स्टेशनरी, | ०२.०० |
| १०. | म.बा.क.कर्मचारी मानधन ,भत्ते तसेच समुह संघटिका मानधन | ०६.०० |
| ११. | ऐच्छिक खर्च (मा.सभापती यांना खर्चाचे अधिकारी राहतील) | ०१.५० |
| | एकूण | २३.४५ |

सारांश तक्ता

| अ.क्र. | तपशिल | र.रुपये लाखात |
|---|---|---|
| १. | म.न.पा. तरतूद व म.न.पा.शासन निर्देशित योजना- उपक्रम खर्च | २७६.५५ |
| २. | म.बा.क.संकीर्ण खर्च | २३.४५ |
| | एकूण | ३००.०० |

**अपंग सहाय्य योजना**

| अ.क्र. | विवरण | र.रुपये लाखात |
|---|---|---|
| १. | विशेष व्यक्ती (अपंग) सर्व्हेक्षण करणेसाठी व यांना एकाच छताखाली सर्व सुविधा व योजनांचा लाभ देणेसाठी कार्यक्रम आयोजित करणे | १०.०० |
| २. | सोलापूर शहरातील विशेष व्यक्ती (अपंगांना) स्वयंरोजगारासाठी शेवया मशीन पुरविणे | १०.०० |
| ३. | तीन चाकी सायकल | १०.०० |
| ४. | सहाय्यभूत साहित्य सुविधा पुरविणे (कुबडया,पांढरी काठी, कर्णमशीन, जयपूर फूट वगैरे) | ५.०० |
| ५. | एमएससीआयटी व इतर व्यवसायाभिमुख प्रशिक्षण देणे | ५.०० |
| ६. | पल्वरायझर मशीन पुरविणे | ५.०० |
| ७. | बारावी शास्त्र परिक्षा पास झालेल्या विद्यार्थी-विद्यार्थ्यांना लॅपटॉप पुरविणे | ५.०० |
| ८. | स्वयंरोजगारासाठी साहित्य पुरविणे | ५.०० |
| ९. | संसारोपयोगी भांडी पुरविणे (विशेष व्यक्ती स्त्री व विशेष व्यक्ती पुरुष असलेस) | ५.०० |
| १०. | महानगरपालिकेचे चार समाजमंदिरामध्ये विशेष व्यक्तीसाठी प्रशिक्षण केंद्र सुरु करणे | ५.०० |
| ११. | विशेष व्यक्तींची क्रीडास्पर्धा भरविणे व सांस्कृतिक कार्यक्रम | ४.०० |
| १२. | विशेष व्यक्तींना (अपंग) मोफत बस प्रवासासाठी सो.म.पा.परिवहन विभागाकरिता | २६.०० |
| १३. | अपंगाच्या पुनर्वसनासाठी विशेष नाविन्यपूर्ण प्रकल्प | ५.०० |
| | एकूण | १००.०० |

..१५

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

नागपूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.अ. ५२४८ क्र. ३२६
दि. ३०।३।२०१५ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



मा. स्थायी समिती ठराव क्र. ७८९ दि. २०/०३/२०१५ नुसार मा. परिवहन समिती सन २०१४-१५ चे सुधारित अंदाजपत्रक व सन २०१५-१६ चे अंदाजपत्रक-ब यास मुं.प्रां.महा.अधिनियम १९४९ चे कलम ९८ अनुसार मा. स्थायी समितीचे शिफारसीनुसार कलम १०० अन्वये मा. महानगरपालिकेचे मान्यता मिळणेस्तव आलेल्या प्रकरणाचे अवलोकन केले.

मा. परिवहन समितीने सूचविलेल्या मा. स्थायी समितीने शिफारस केलेल्या सन २०१४-१५ चे सुधारित अंदाजपत्रकास मान्यता देणेत येत आहे. परिवहन उपक्रमाचे सन २०१५-१६ चे मा. परिवहन समिती मा. स्थायी समितीने शिफारस केलेले अंदाजपत्रक-ब मध्ये पुढीलप्रमाणे दुरुस्त करून सूचना व शिफारसीसह मुं.प्रां.महा.अधिनियम १९४९ चे कलम १०० अन्वये मान्यता देणेत येत आहे.

<u>जमा बाजू-</u>

| अ.क्र. | विवरण | मा. परिवहन समितीने २४० बसेस करीता सूचविलेला अंदाज | मा. म.न.पा. ने २०० बसेस करीता केलेली तरतूद | मा. म.न.पा. ने केलेली तरतूद | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | वाढ | कपात |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १अ | बसभाडे | ५०,१८,७५,०००/- | ४१,४२,७५,०००/- | - | ८,७६,००,०००/- |
| १ब | पासेस | २,९७,००,०००/- | २,००,००,०००/- | - | ९७,००,०००/- |
| १क | रिझर्व्ह बसेस (कंत्राटी पासेस) | ३५,००,०००/- | २०,००,०००/- | - | १५,००,०००/- |
| क(१) | जाहिरातीचे उत्पन्न व बस क्यू शेड | ५०,००,०००/- | २५,००,०००/- | - | २५,००,०००/- |
| अ | व्हॅट | २५,०००/- | ३,२५,०००/- | ३,००,०००/- | - |
| ड | म.न.पा.कडे सेवा करणारे सेवकांचे वेतन | २५,००,०००/- | २०,००,०००/- | - | ५,००,०००/- |
| ५ | निरूपयोगी सामान विक्री | २,००,०००/- | १,००,०००/- | - | १,००,०००/- |
| १३ | जुने बसेस विक्री | - | ६०,००,०००/- | ६०,००,०००/- | - |
| १४ | मा. मनपाकडून अनुदान | ३४,९८,२६,०००/- | ७,००,००,०००/- | - | २७,९८,२६,०००/- |
| | परिवहनकडील सातरस्ता सब डेपो विकसित करणे | - | २३,११,५१,०००/- | २३,११,५१,०००/- | - |
| | **भांडवली जमा-**<br>मा. अध्यक्ष, परिवहन समिती नविन कार खरेदी | - | ७,००,०००/- | ७,००,०००/- | - |
| | एकूण | | | २३,८१,५१,०००/- | ३८,१७,२६,०००/- |

| | | |
|---|---|---|
| एकूण जमेत कपात- | रक्कम रू. | ३८,१७,२६,०००/- |
| एकूण जमेत वाढ- | रक्कम रू. | २३,८१,५१,०००/- |
| एकूण जमेत कपात- | रक्कम रू. | १४,३५,७५,०००/- |
| मा. परिवहन समिती यांनी सूचविलेली एकूण जमा- | रक्कम रू. | १३८,३१,०६,०००/- |
| मा. म.न.पा.ने सूचविलेली जमेत कपात- | रक्कम रू. | १४,३५,७५,०००/- |
| मा. म.न.पा.ने सूचविलेली एकूण जमा- | रक्कम रू. | १२३,९५,३१,०००/- |
| आरंभी शिल्लक | रक्कम रु. | १,००,०००/- |
| एकूण | रक्कम रु. | १२३,९६,३१,०००/- |

**<u>खर्च बाजू-</u>**

| अ.क्र. | विवरण | मा. परिवहन समितीने २४० बसेस करीता सूचविलेला अंदाज | मा. म.न.पा. ने २०० बसेस करीता केलेली तरतूद | मा. म.न.पा. ने केलेली तरतूद | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | वाढ | कपात |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ड | वहामत्ता | ३८,००,०००/- | ३२,००,०००/- | - | ६,००,०००/- |
| २ | संकिर्ण | ५०,००,०००/- | ३०,००,०००/- | - | २०,००,०००/- |
| ३ | भाडेतत्वावरील बसेस | - | ३,५०,०००/- | ३,५०,०००/- | - |
| ३अ | डिझेल लुब्रीकेटिंग खर्च | २९,६१,६०,०००/- | २०,००,००,०००/- | - | ९,६१,६०,०००/- |
| ३ब | सुटेभाग रवरीधावा | १२,१५,१५,०००/- | ९,५०,००,०००/- | - | २,६५,१५,०००/- |
| ५ | ई-तिकिटिंग संगणकीकृत | ५४,००,०००/- | २०,००,०००/- | - | ३४,००,०००/- |
| ११ | रोख वक्षीस | ४५,००,०००/- | ३७,००,०००/- | - | ८,००,०००/- |
| १२ | बस मुक्काम खर्च | १०,००,०००/- | ८,००,०००/- | - | २,००,०००/- |
| १३ | अपघात व नुकसान भरपाई | ३०,००,०००/- | २०,००,०००/- | - | १०,००,०००/- |
| १४ | कोर्ट केसेस व वकिल फी | १,५०,०००/- | १,००,०००/- | - | ५०,०००/- |
| १५ | टेलिफोन | २,००,०००/- | १,००,०००/- | - | १,००,०००/- |
| १६ | प्रवास खर्च बील | २,००,०००/- | १,००,०००/- | - | १,००,०००/- |
| १७ | व्हॅट | २५,०००/- | ३,२५,०००/- | ३,००,०००/- | ------ |
| १८अ | बस झीज (घसारा निधी) | --- | ५०,००,०००/- | ५०,००,०००/- | ----- |
| २३ | बालकपोषण निधी | ९०,००,०००/- | ५०,००,०००/- | - | ४०,००,०००/- |
| ३ब | कंत्राटी सेवकांचे वेतन | ६,००,००,०००/- | ४,५०,००,०००/- | - | १,५०,००,०००/- |
| २अ | **<u>भांडवली खर्च-</u>**<br>मा. अध्यक्ष परिवहन समिती कार खरेदी | - | ७,००,०००/- | ७,००,०००/- | - |
| | एकूण | | | ६३,५०,०००/- | १४,९९,२५,०००/- |

| | | |
|---|---|---|
| मा. म.न.पा. यांनी खर्चात केलेली कपात- | रक्कम रू. | १४,९९,२५,०००/- |
| मा. म.न.पा. यांनी खर्चात केलेली वाढ- | रक्कम रू. | ६३,५०,०००/- |
| एकूण खर्चात कपात- | रक्कम रू. | १४,३५,७५,०००/- |
| मा. परिवहन समितीने सूचविलेला एकूण खर्च- | रक्कम रू. | १३८,३१,०६,०००/- |
| मा. म.न.पा.ने केलेली खर्चात कपात- | रक्कम रू. | १४,३५,७५,०००/- |
| मा. म.न.पा.ने सूचविलेला एकूण खर्च- | रक्कम रू. | १२३,९५,३१,०००/- |
| अखेरची शिल्लक | रक्कम रु. | १,००,०००/- |
| एकूण | रक्कम रु. | १२३,९६,३१,०००/- |

मा. महाराष्ट्र शासनाकडील अधिका-याची परिवहन व्यवस्थापक म्हणून नेमणूक करणेस मान्यता देणेत येत आहे.

सध्या असलेल्या बदली सेवकांना कायम करण्यांत यावे. व कंत्राटी पध्दतीवर यापूर्वी घेतलेल्या कंत्राटी चालक व वाहक यांना बदली सेवक म्हणून समाविष्ट करावे.

नगरसचिव

[illegible] महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/~~खास~~ सर्वसाधारण सभेपुढे विषय क्र.जा ५३५ ठ. क्र. ३२९ दि. ३०/३/२०१५ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/~~सर्वानुमते~~ पास झाला.



प्राथमिक मंडळाचे सन २०१५-१६ चे प्राथमिक शिक्षण व बिगर प्राथमिक शिक्षणाचे अंदाजपत्रक प्रशासनाधिकारी यांनी तयार केलेले असून, सदरच्या अंदाजपत्रक प्राथमिक शिक्षण मंडळ प्रशासनाधिकारी यांनी जा.क्र.३०७९ दि.२/२/२०१५ ने मंजूर करुन महापालिकेच्या मान्यतेस्व सादर केलेले आहे. सदर अंदाजपत्रकात आवश्यक दुरुस्ती व तरतुदी सूचविण्यात आलेल्या आहेत. सबब प्रस्तुत अंदाजपत्रकास मान्यता मिळणेस्तव मा.आयुक्त यांचे दि.१९/३/२०१५ चे टिपणीने आलेल्या प्रकरणाचे अवलोकन केले.

प्राथमिक शिक्षण मंडळाचे सन २०१५-१६ चे बिगर प्राथमिक शिक्षणाचे अंदाजपत्रकात पुढील फेर फार करुन सूचना शिफारशीसह मान्यता देण्यात येत आहे.

**महानगरपालिका बिगर प्राथमिक शिक्षण मंडळ, सोलापूर**

| अ.नं. | तपशिल | मा.आयुक्त यांचा अंदाज | मा.मनपाने केलेले फेर बदल | | मा.मनपाने मान्य केलेला अंदाज |
|---|---|---|---|---|---|
| | | | वाढ | कमी | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| २ | १०० % मनपा खर्चावरील कर्मचाऱ्यांचा पगार | | | | |
| अ | शारीरिक शिक्षक (३ पदे) | - | २०,२९,००० | - | २०,२९,००० |
| ब | चित्रकला शिक्षक (५ पदे) | - | २३,०५,००० | - | २३,०५,००० |
| क | संगीत शिक्षिका (२ पदे) | - | ८,४०,००० | - | ८,४०,००० |
| ड | पर्यवेक्षक (२ पदे) | - | १०,७६,००० | - | १०,७६,००० |
| इ | लिपीक (२ पदे) | - | ५,५०,००० | - | ५,५०,००० |
| फ | शिपाई (३३ पदे) | - | १,०७,४०,००० | - | १,०७,४०,००० |
| ३ | नाईट क्लास | | | | |
| अ | अॅरेबिक नाईट क्लास | ३०,००० | २०,००० | - | ५०,००० |
| ब | कन्नड नाईट क्लास | ३०,००० | २०,००० | - | ५०,००० |
| क | उर्दू नाईट क्लास | ३०,००० | २०,००० | - | ५०,००० |
| ४ | ग्रंथपाल मानधन | ३०,००० | २०,००० | - | ५०,००० |
| १० | ८ मार्च महिला दिन | १,००,००० | - | ५०,००० | ५०,००० |
| १२ | बालवाडी ते ७ वी च्या विद्यार्थ्यांना गणवेश (प्रत्येकी दोन गणवेश) | १०,००,००० | - | ५,००,००० | ५,००,००० |
| १३ | स्कूल बॅग/वॉटर बॅग/शूज | ४,००,००० | - | २,००,००० | २,००,००० |
| १६ | संकीर्ण | १,५०,००० | - | ५०,००० | १,००,००० |
| १७ | सभापती ऐच्छिक खर्च | १,५०,००० | - | ५०,००० | १,००,००० |
| १९ | स्टेनो वेतन | ७५,००० | - | ७५,००० | - |
| ३० | संगणक खरेदी व देखभाल खर्च / कार्यालय संगणकीकरण करणे | २,००,००० | - | १,३५,००० | ६५,००० |
| ३४ | शालेय इमारत रंगसफेदी / किरकोळ दुरुस्ती | ३,००,००० | - | १,००,००० | २,००,००० |
| ३५ | कार्यालयीन लाईट फिटींग/स्वच्छतागृह कामे करणे/फर्निचर/ पंखे खरेदी करणे | १,००,००० | - | ५०,००० | ५०,००० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३७ | सभापती /AO मोटार खर्च व इंधन बिल | ५,००,००० | - | २,००,००० | ३,००,००० |
| ३९ | सभापती/पक्षनेता/विरोधी पक्षनेता फोन/इंटरनेट बिल | २०,००० | - | १०,००० | १०,००० |
| ४१ | तेलगू शिक्षक अनुदान (६) | ५,००,००० | - | ६८,००० | ४,३२,००० |
| ४३ | मनपा शाळामध्ये ग्रीन बोर्ड बसविणे | २,००,००० | - | १,००,००० | १,००,००० |
| ४५ | कार्यालयात अग्निशमन यंत्रणा बसविणे | ५०,००० | - | ५०,००० | - |
| ४७ | सीसीटीव्ही कॅमेरा बसविणे | २,००,००० | - | २,००,००० | - |
| ४८ | बायोमेट्रीक मशीन बसविणे | ४०,००० | - | ४०,००० | - |

उपरोक्त बदलामुळे एकूण बिगर प्राथमिक अंदाजपत्रकाची बेरीज र.रु. २,००,००,०००/- ऐवजी र.रु. ३,५७,४२,०००/- इतकी येते.

शिक्षण मंडळाचे कामकाजासंबंधिचे नियम मा. सर्वसाधारण सभा ठराव क्र. ३२६, दिनांक १९-३-२०१५ अन्वये मंजूर केलेले आहे. त्या नियमाप्रमाणे मा. शासनाच्या मान्यतेस आधिन राहून शिक्षण मंडळाचे कामकाज सुरु करावे व मा. शासनाची लवकरात लवकर मान्यता घ्यावी.

या अंदाजपत्रकात ज्या बिगर प्राथमिक शिक्षण मंडळासाठी तरतूदी ठेवण्यात आल्या आहेत. त्या तरतूदीतून गरजेप्रमाणे प्रस्ताव तयार करुन मा. पदाधिका-यांची मान्यता घ्यावी. प्रशासनाधिकारी यांनी कोणताही खर्च मान्यतेशिवाय करता येणार नाही.

शिक्षण मंडळाचा कारभार पारदर्शक व लोकाभिमुख होण्यासाठी व शासकीय योजनांचा फायदा गरिब लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रशासकीय अधिका-यांनी आरटीई कायद्याप्रमाणे तंतोतंत कार्यवाही करावी व म.न.पा. सक्षम प्राधिकारी असल्याने सक्षम मान्यता घेऊनच सर्व कामकाज करावे.

नगरसचिव

सोलापूर महानगरपालिका